# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## "पीएमपीएमएल" चा स्वच्छ भारत अभियानात उत्स्फूर्त सहभाग

### मुख्य प्रशासकीय कार्यालय व सर्व १५ डेपोंमध्ये स्वच्छता अभियानांतर्गत वृक्षारोपण

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. (पीएमपीएमएल) कडून दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत स्वच्छ भारत अभियानांतर्गत परिवहन महामंडळाचे मुख्य प्रशासकीय कार्यालय, सर्व १५ डेपो व मुख्य बसस्थानकांवर स्वच्छता अभियान राबवून वृक्षारोपण देखील करण्यात आले.

मुख्य प्रशासकीय कार्यालयात परिवहन महामंडळाच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. दिपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी सहव्यवस्थापकीय संचालक मा. श्री. नितीन नार्वेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. प्रज्ञा पोतदार-पवार व सर्व विभागप्रमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वच्छता अभियानांतर्गत बसेस, डेपो परिसर, मुख्य बस स्थानके व मुख्य बस थांब्यांची स्वच्छता करणेत आली. परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी आपले घर व घराचा परिसर तसेच आपली संस्था व संस्थेचा परिसर स्वच्छ ठेवून आपले शहर, आपले राज्य व पर्यायाने आपला देश स्वच्छ करणेसाठी निरंतर प्रयत्नशील राहणार असलेबाबत स्वच्छतेची प्रतिज्ञा घेतली. "स्वच्छता ही सेवा" आणि "स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता" ही संकल्पना रूजविण्यासाठी दि. २ ऑक्टोबर हा दिवस "स्वच्छ भारत दिवस" म्हणून साजरा करणेत आला.

सर्व डेपोंमध्ये स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी डेपो मॅनेजर, डेपो मेन्टेनन्स इंजिनिअर व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

---

दि. ०३ /१०/२०२४

मा. संपादक,
दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

Sd/-
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---